रे.मु.नं. ३०/२००७

# निशाणी क्र. ८५ वरील आदेश

१. प्रस्तुतचा अर्ज वादीने प्रतिवादी अरूण गणेश दाते यांचे वारस रेकॉर्डवर घेवून दाव्यात दुरूस्ती करणेसाठी दाखल केला आहे.

२. वादीचे कथन असे की, प्रतिवादी अरूण गणेश दाते दि. ९/३/२०१५ रोजी मयत झाले. त्यांच्या पश्चात त्यांची पत्नी देवयानी अरूण दाते मुलगी कु. प्राची अरूण दाते व मुलगा रूषिकेश अरूण दाते हेच वारस आहेत.

३. प्रस्तुतचे प्रकरणात प्रतिवादींच्या वकीलांनी सदर अर्जावर त्यांचे म्हणणे दाखल केलेले असल्याने प्रतिवादींच्या वारसांना नोटीसेस काढण्यात आलेल्या नाहीत. प्रतिवादींनी प्रस्तुतच्या अर्जास हरकत घेतली. त्यांचा आक्षेप असा की, सदर अर्ज दाखल करण्यास विलंब माफीसाठी व अबेटमेंट रद्द करणेसाठी वादीने कोणताही अर्ज दाखल केलेला नसल्याने सदरचा अर्ज फेटाळण्यात यावा.

४. अर्जाचे अवलोकन केले असता निदर्शनास येते की, प्रतिवादी अरूण गणेश दाते यांचे दि.९/३/२०१५ रोजी निधन झाले असून प्रस्तुतचा अर्ज दि.२७/१/२०१६ रोजी दाखल केला आहे. वादीने विलंबाबाबत कोणतेही कारण नमुद केलेले नाही, परंतू त्यांचे म्हणणे असे की, विलंब माफ करून प्रतिवादींच्या वारसांना सदर प्रकरणात दाखल केल्यास प्रतिवादींच्या हक्कावर किंवा बचावावर कोणतीही बाधा येत नाही. सदरचा अर्ज खारीज केल्यास वादीचे अपरिमित नुकसान होईल.

५. वादी शपथेवर सांगतो की, सदर अर्जातील वारसां व्यतिरीक्त मयत प्रतिवादीचे इतर कोणीही वारस नाहीत. त्यांचे कथन गृहीत धरून सदर प्रतिवादीच्या वारसांना दाव्यात दाखल करणे न्यायाचे ठरेल. तसे केल्यास प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. सदर कारणाने खालीलप्रमाणे आदेश करण्यात येते.

## **आदेश**

१. प्रस्तुतचा अर्ज मंजूर करण्यात येत आहेत.

२. अर्जदाखल करण्यास झालेला विलंब माफ करण्यात येत आहे.

३. वादीने सदरच्या प्रकरणात प्रतिवादी अरूण गणेश दाते यांच्या वारसांना सामील करावे.

४. वादीने योग्य ती दुरूस्ती करून दुरूस्त प्रत पुढील तारखेपर्यंत अभिलेखावर दाखल करावी.

५. मयत प्रतिवादी अरूण गणेश दाते यांच्या वारसांना अभिलेखावर दाखल केल्यानंतर त्यांना दाव्याचे समन्स काढण्यात यावेत.

अलिबाग,
दि. ०८/०२/२०१६

(अ.रा.कांबळे)
२रे सह दिवाणी न्यायाधिश, व.स्तर,
अलिबाग.